NAVSHAKTI, TUESDAY January 31, 2017

'मोक्का'तर्गत कारवाई करण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेचे सहा. पोलीस आयुक्त नितीन कौसाडीकर यांनी दिली.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या टोळीने गत २६ डिसेंबर रोजी बिल्डर सुनिल महादेव पाटील याच्या कामोठे सेक्टर-११ मधील सूर्या पाटील बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स या कार्यालयात घुसून पिस्तुलच्या धाकाने सुनिल पाटील याच्याजवळचे ५५ तोळे वजनाचे दागिने तसेच

दरोडा, दरोड्याची तयारी, जबरी चोरी, घरफोडी, अग्निशस्त्र बाळगणे असे वेगवेगळ्या प्रकारचे ३२ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी प्रशांत महादेव ठाकूर याच्यावर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, घरफोडी, अग्निशस्त्र बाळगणे असे एकूण १२ गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त कौसाडीकर यांनी दिली.

संस्थेतर्फे 'गोवर्धन स्कूल ऑफ योगा' सुरू करत असल्याची घोषणा आज करण्यात आली. यावेळी गोवर्धन इको व्हिलेजचे संचालक गौरांग दास म्हणाले की, या पुरस्काराचे मानकरी ठरणे ही आमच्यासाठी अभिमानाची आणि प्रतिष्ठेची बाब आहे.

# ल हस्तक्षेप

## ाव्हाणकर

नोंदी करतानाच त्यांची हत्या होऊ नये म्हणून जनजागरण करण्यात येत असून, पक्षांमुळे निसर्ग अजून खुलतो. त्यामुळे मुक्या प्राणी-पक्षांवर दया केली पाहिजे असे सांगितले. प्रमुख पाहुणे राजू कोसंबे यांनी सांगितले की, निसर्ग संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे. 'बर्ड टुरिझम'साठी इच्छा शक्ती व काम करण्याची गरज आहे. यावेळी पत्रकार वैष्णवी राऊत यांना निसर्ग पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला तर वन्यजीव फोटोग्राफी राज्यस्तरीय स्पर्धेत वसईचे राजन राऊत प्रथम पारितोषिक मिळाले.

# भाईंदरमध्ये साडेचार वर्षांनी झाली मतमोजणी

## अपक्ष उमेदवार वत्सला पाटील विजयी

भाईंदर, दि. ३० (वार्ताहर) - ऑगस्ट २०१२ साली झालेल्या मीरा-भाईंदर महापालिकेच्या प्रभाग १८अ मधील निवडणुकीचा निकाल अखेर आज मतमोजणी होऊन जाहीर करण्यात आला. याच प्रभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील यांच्या आई वत्सला पाटील ह्या अपक्ष म्हणून तब्बल १०३३ च्या दणदणीत मताधिक्याने निवडून आल्या. विशेष म्हणजे येत्या ऑगस्ट महिन्यात पालिकेची पुन्हा सार्वत्रिक निवडणुक होणार असून पाटील यांचे नगरसेवक पद काही महिन्यांपुरतेच राहणार असले तरी पालिकेत पहिल्यांदाच आई व मुलगा नगरसेवक बनले आहेत.



महापालिकेच्या ऑगस्ट २०१२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग '१८ अ' या इतर मागासवर्ग महिलांसाठी राखीव मतदार संघातुन अपक्ष म्हणून वत्सला पाटील, तेजल परमार तर भाजपाच्या रीटा शाह व काँग्रेसच्या सरिता वायंगणकर यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. त्यात शाह यांचा अर्ज जातीच्या दाखल्या वरुन बाद झाला. त्या विरोधात शाह यांनी उच्च न्यायालय व पुढे सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. तेव्हांपासुन सदर मतपेट्या सील बंदच होत्या. अखेर साडेचार वर्षांनी सर्वोच्च न्यायालयाने बंदी हटवून मोजणीचा आदेश दिला. त्या अनुषंगाने शुक्रवारी मतमोजणी झाली असता त्यात वत्सला पाटील यांना २८४६ मतं, परमार यांना १८१३ तर वायंणकर यांना ५७७ मते मिळाली. या प्रभागातील 'ब' गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील हे आधीच निवडून आले होते. आता त्यांच्या आई देखील नगरसेविका झाल्या आहेत. यावेळी राष्ट्रवादीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

# ीत विजेचा शॉक लागून

## गारांचा मृत्यू

तळोजा एमआयडीसीतील गौशिया कोल्ड साफसफाई करण्यासाठी उतरलेल्या तीन तिन्ही कामगारांचा दुर्दैवी अंत झाल्याची स घडली. तळोजा पोलिसांनी या प्रकरणी दुर्घटनेचा अधिक तपास सुरू केला आहे. वार अशा प्रकारच्या घटना घडत असल्याचे सरातील कामगारांची सुरक्षा आता रामभरोसे

क्रमांक 'एम-७'वर गौशिया कोल्ड स्टोरेज स्वच्छ करुन त्यांची पॅकींग केली जाते. या यासाठी कंपनीमध्ये जमिनीच्या खाली मोठी आहे. या टाकीतील पाणी खराब झाल्याने रात्री १०च्या सुमारास सदरची टाकी स्वच्छ र टाकीतील पाणी बाहेर काढण्यासाठी मोटर मोटारच्या सहाय्याने टाकीतील पाणी बाहेर मध्ये तीन फूट पाणी शिल्लक असताना, सदर साठी एक कामगार उतरला होता. मात्र, लेल्या मोटरमधील वीज प्रवाह पाण्याच्या साफसफाईसाठी उतरलेल्या कामगाराला याच्या टाकीत पडला.

र पाण्याच्या टाकीत उतरला असता, त्याला कीत पडला. त्यामुळे तिसरा कामगार नंतर त्याला देखील विजेचा शॉक लागून तो पाण्याच्या टाकीमध्ये वीज प्रवाह उतरला ल्या तिन्ही कामगारांचा काही वेळातच दुर्दैवी

# पोलादपूरचे माजी सभापती महादेव निविलकर. राष्ट्रवादीतून शिवसेनेत

पोलादपूर, दि. ३० (वार्ताहर) - रायगड जिल्हा परिषद आणि पोलादपूर पंचायत समितीच्या पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती महादेव निविलकर यांनी राष्ट्रवादीमधून शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्यासमवेत गोटू चिपळूणकर, आनंद देवे, महादेवमेस्त्री निविलकर, विठोबा मांडले, हरि मांडले, दत्ताराम निविलकर, सूरज वरवाटकर, नारायण टेरवकर, काशिनाथ आंबीलकर, काशिनाथ वरवाटकर, भाऊ वरवाटकर, निलेश आजगणकर आदी खडकवणे येथील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला.

TATA

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

कंपनीच्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांकरिताच्या लेखापरिक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांना इतर बाबींसह विचारात आणि पटलावर घेण्यासाठी मंगळवार, ७ फेब्रुवारी, २०१७ रोजीस आयोजित करण्यात आली आहे.

वित्तीय निष्कर्ष हे कंपनीचे संकेतस्थळ www.tatasteel.com तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे संकेतस्थळ www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडचे संकेतस्थळ www.bseindia.com यावर उपलब्ध असणार आहे.

जानेवारी 30, 2017
मुंबई

**टाटा स्टील लिमिटेड**
सही/-
**पार्वथीसम के**
कंपनी सचिव

**TATA STEEL**